Module : 3

BA III Sem VI 2020-21
Developmental Psy.
Paper XIV DSE-E-213
Dr. Vinayak Honmore

# Adolescence
# किशोरावस्था



**प्रस्तावना :**

बाल्यावस्था आणि प्रौढावस्था या दोन अवस्थांदरम्यानची संक्रमणाची स्थिती म्हणजे किशोरावस्था होय. या अवस्थेची सुरुवात टीन शेवट हा टीन एज संबोधन होते. म्हणजेच Thirteen (13) ते Nineteen (19) होय. किशोरावस्था ही संक्रमणाची स्थिती आहे. किशोरांची गणना ना लहानांमध्ये होते ना मोठ्यांमध्ये. एकंदरीत किशोरावस्थेचा कालावधी हा शारीरिक व मानसिक वाढ आणि बदलाचा कालावधी होय.

## 3.1 Identity : Asking who am I ? ओळख : मी कोण आहे ?

तेरा वर्षाच्या मुलाला किती दबावाचा सामना करावा लागतो याची कल्पनाही करता येणार नाही. त्यांचे दिसणे, वागणे, योग्य कपडे परिधान करणे, याविषयी त्यांची व त्यांच्या मित्रांच्या कल्पना भिन्न भिन्न असतात. पालकांच्या अपेक्षा तर या दोहोंहून भिन्न असतात. परिणामी आपण कोण आहोत याविषयीचा संभ्रम निर्माण होतो.

वरील परिस्थितीमध्ये तेरा वर्षाच्या मुलाचे आपल्या जीवनामध्ये अथवा समाजामध्ये नव्याने ओळख प्रस्थापित असताना त्याची स्वः आकलनाविषयीची स्पष्टता दिसून येते. किशोरावस्थेमध्ये मी कोण आहे ? या विश्वात माझे स्थान काय आहे ? या सारखे प्रश्न अग्रक्रमाने निर्माण होतात.

किशोरावस्थेमध्ये ओळखी विषयीचे मुद्दे का इतके महत्वपूर्ण बनतात ? यापैकी एक महत्वाचे कारण त्यांच्या बौद्धिक क्षमतांमध्ये आहे. आपण एक स्वतंत्र व्यक्ती आहोत इतरांहून आपले वेगळे अस्तित्व आहे याची त्यांना जाणीव होते. किशोरावस्थे दरम्यान घडणाऱ्या नाटकीय शारीरिक बदलांमुळे ते आपल्या शरीराप्रती व इतरांच्या वर्तनाप्रती सजग होतात. एकंदरीतच त्यांच्या स्व ओळखविषयक तसेच स्वः संकल्पना आणि स्व-आदर यामध्ये लक्षणीय बदल घडून येतात.

### (A) Self-concept and Self-esteem स्व-संकल्पना आणि स्व-आदर :

तुम्ही कोण आहात आणि तुम्हाला स्वतः विषयी वाटते ? या सारखे प्रश्न किशोरावस्थेदरम्यान महत्त्वाची आव्हाने निर्माण करतात.

### (I) Self-concept : Asking what am I like ? स्व-संकल्पना : मी कसा आहे ?

प्रियाला तिची स्वतःची ओळख करून द्यायला सांगितली असता ती स्वतःविषयी सांगते की इतर व्यक्ती मला निवांत, जास्त काळजी न करणारी समजतात परंतु प्रत्यक्षात मात्र मी नेहमी चिंताग्रस्त व भावनिक आहे असे ती सांगते.

इतरांचा तिच्या विषयीचा दृष्टिकोनाहून आपला स्वतःचा दृष्टिकोन वेगळा करणं ही प्रियाच्या किशोरावस्थेमधील प्रगतीचे द्योतक आहे. लहानपणी मात्र प्रिया प्रदर्शित करीत असणारी गुणविशेष ही तिचा व इतरांचा स्वतःविषयीच्या गुणविशेषामध्ये भेद करणारे नव्हते. तथापि हा भेद करण्यात किशोर सक्षम असतात. आपण कोण आहोत हे स्पष्ट करण्याकरिता ते स्वतःचा आणि इतरांच्या दृष्टिकोनाचा अंगिकार करतात.

आपण कोण आहोत याविषयीचे वाढते आकलन स्पष्ट करणारा हा विस्तृत दृष्टिकोन हा

किशोरावस्थेचा एक पैलू आहे. ते स्व चे अनेकविध पैलू पाहू शकतात यासोबत त्यांचा स्व-विषयक हा दृष्टिकोण अधिक सुसंघटित आणि सुसंगत बनतो. ते स्व कडे मानसशास्त्रीय दृष्टीने पाहू लागतात परिणामी गुणवैशिष्ट्यांना ठोस रूपात न पहाता अमूर्त रूपात पाहू लागतात.
उदा: लहान मुलांच्या तुलनेत किशोर स्वतःला आपल्या विचारधारेच्या रूपात स्पष्ट करू इच्छितात जसे की मी पर्यावरणवादी आहे. मी अधिक गतीने धावू शकतो हा शारीरिक गुणवैशिष्ट्ये स्पष्ट करणारा विचार मागे पडतो.

हा बहुआयामी स्व-संकल्पना विषयक विस्तृत दृष्टिकोणास संमिश्र प्रतिक्रिया मिळतात. विशेषतः पूर्व किशोरावस्थेमध्ये किशोरांना व्यक्तिमत्वाच्या अनेकांगी पैलूंच्या परिणामी समस्यांची निर्मिती होते. या अवस्थेमध्ये किशोरांना स्वतःकडे विशिष्ट पद्धतीने पहावयाचे असते जसे मी समाजशील आहे आणि मला लोकांमध्ये रहावयास आवडते. त्यांचे वर्तन जेव्हा त्यांच्या या विचाराशी विसंगत असते तेव्हा ते चिंताग्रस्त बनतात. उदा: जरी मी समाजशील असलो तरीही मला माझ्या मित्रांसमवेत रहाता येत नाही, मला एकटे रहायचे आहे. किशोरावस्थेच्या शेवटी शेवटी मात्र विभिन्न परिस्थिती विभिन्न भावना आणि वर्तनाची निर्मिती होते याची जाणीव किशोरांना होते.

(II) Self-esteem: Asking how do i like myself? स्व-आदर: मला मी कसा आवडतो?
: आपण कोण आहोत आणि आपण जसे आहोत तसे आवडतो या दोन भिन्न गोष्टी आहेत जरी किशोरांना आपण कोण आहोत याविषयीचे (स्व-संकल्पना) आकलन वाढत असले तरीही या ज्ञानाच्या परिणाम स्वरूपी ते स्वतःला आवडतात (स्व-आदर) याविषयीची खात्री देता येत नाही. वस्तुतः त्यांचे स्वतःविषयीचे वाढते आकलन त्यांना स्वतःला पूर्णरूपात पहाण्यास मदत करतात. या त्यांच्या स्व-संवेदनाच्या परिणाम स्वरूपी स्व-आदराची समज विकसित होते.

या बोधात्मक सुधारणेच्या परिणाम स्वरूपी किशोरांना स्व चे विविध पैलूमध्ये भेद करण्याची संधी मिळते परिणामी स्वच्या पैलूंचे भिन्न पद्धतीने मूल्यमापन करण्याची संधी प्राप्त होते. उदा: एखाद्या किशोरामध्ये शैक्षणिक निष्पादन विषयक उच्च स्व-आदर असू शकतो तथापि इतरांशी असणाऱ्या नातेसंबंधा विषयीचा स्व-आदर निम्न पातळीचा असू शकतो.

मला मी आवडतो का? मला माझ्यामधील काही गोष्टी आवडतात जसे मी उत्तम श्रोता अथवा ऐकणारा आहे, मी चांगला मित्र आहे तथापि मला माझ्या नकारात्मक बाजू जसे माझे शैक्षणिक संपादन उत्तम नाही. माझ्या विषयीची सर्वोत्तम गोष्ट म्हणजे मी एक चांगला, निष्ठावान मित्र आहे.

(III) Gender differences in Self-esteem स्व-आदरामधील लिंगभेद: किशोरांमधील स्व-आदर कोणत्या घटकांमुळे निर्धारित होतो? यामध्ये अनेक घटक महत्वपूर्ण भूमिका बजावतात. त्यापैकी एक महत्वाचा घटक म्हणजे लिंगभेद. प्रामुख्याने पूर्व किशोरावस्थे दरम्यान मुलींचा स्व-आदर मुलांच्या तुलनेत अधिक निम्न व विचलन दर्शविणारा असतो. हे असे असण्यापाठी एक महत्वाचे कारण म्हणजे मुलांच्या तुलनेत मुली या त्यांच्या शारीरिक दिसण्याविषयी आणि शैक्षणिक संपादनाविषयीच्या सामाजिक यशाविषयी अधिक सजग असतात. जरी या पैलूंविषयी मुले देखील अधिक विचार करणारी असली तरी देखील याविषयीचा त्यांचा दृष्टिकोन मुलींच्या तुलनेत अधिक निष्काळजी अथवा वरवरचा असतो. यासोबत या विषयीचे सामाजिक संदेश असे सुचवितात की

Scanned with CamScanner

मुलींचे शैक्षणिक संपादन, अथवा सामाजिक यश हे मुलींच्या दृष्टीने अडचणीचे ठरते. मुलींनी शैक्षणिक क्षेत्रात उत्तम कामगिरी केल्यास त्यांचे सामाजिक यश संकटात सापडते. परिणामी मुलांच्या तुलनेत मुलींचा स्व-आदर अधिक नाजूक अथवा कमकुवत असतो.

सर्वसाधारणपणे, किशोरवयीन मुलींच्या तुलनेत मुलांचा स्व-आदर उच्च असतो तथापी मुलांमध्ये विचलनता दर्शविणारे अनेक घटक असतात. उदा: समाजाची लिंग अपेक्षा विरूद्ध सांचेबद्धतांच्या मुळे मुलांना स्वतःविषयी अधिक विश्वासू, कणखर आणि निर्भय बनावे लागते. मुलांनाही अडथळ्यांचा सामना करावा लागतो जसे त्यांना आवडणाऱ्या मुलीने नकार देणे, यामुळे ते दुःखी बनतात बऱ्याचदा अक्षम समजतात. स्व-आदराच्या कमतरतेसाठी सर्वात महत्वाचे कारण म्हणून स्वतःच्या, पालकांच्या, शिक्षकांच्या शैक्षणिक अपेक्षांची पूर्ती करण्यातील अक्षमतेकडे पाहिले जाते. परिणामी समाजाच्या अपेक्षा आणि दबाव हा शैक्षणिक संपादनामध्ये महत्वाची भूमिका बजावतात.

(IV) Socioeconomic status and race differences in self-esteem स्व-आदरा-मधील सामाजिक आर्थिक दर्जा आणि वांशिक भेद : स्व-आदरावर सामाजिक आर्थिक दर्जा आणि वंश याचा प्रभाव पडतो. उच्च सामाजिक आर्थिक दर्जाच्या मध्य व उत्तर किशोरवयीन किशोरांचा स्व-आदर देखील उच्च असतो. व्यक्तीचा सामाजिक दर्जा विशेषतः चांगले कपडेलत्ते, राहणीमान यांच्यामुळे स्व-आदारामध्ये वृद्धिच होते.

स्व-आदरामध्ये जाति आणि वांशिकता यांची भूमिका सुद्धा महत्वाची ठरते. अल्पसंख्यांक दर्जाच्या परिणामस्वरूपी निम्न स्व-आदराची निर्मिती होते असे संशोधनाचे निष्कर्ष सुचवितात. आफ्रिकन अमेरिकन आणि हिस्पॅनिक वंशाच्या व्यक्तीमध्ये इतर वंशांच्या व्यक्तींच्या तुलनेत निम्न स्व-आदर दिसून आला. समाजामध्ये त्यांच्याविषयीची पूर्वग्रहित अभिवृत्ती मुळे त्यांना नाकारले जाते तसेच नावडीची भावना जाणवते. सध्याच्या संशोधनातून मात्र यापेक्षा वेगळे निष्कर्ष प्राप्त झाल्याचे दिसून आले आहे. यापाठीमागचे महत्वाचे कारण म्हणजे आफ्रिकन अमेरिकन समुदायाच्या सामाजिक-चळवळी होत. आपल्या जातीच्या ओळखीविषयीची तिव्र भावना ही उच्च स्व-आदराच्या पातळीशी निगडीत असल्याचे दिसून आले आहे.

विभिन्न वांशिक समुदायामधील किशोरांमध्ये सारख्या पातळीच्या स्व-आदरापाठी मागील घाबरी एक महत्वाचे कारण म्हणजे किशोर आपल्या सामर्थ्यात प्रगती करण्याकरिता उपयुक्त ठरणाऱ्या निवडी व प्राधान्य क्रमांना अधिक महत्व देतात. आफ्रिकन अमेरिकन किशोर हे आपणास समाधान वाटेल आणि स्व-आदरामध्ये वृद्धी होईल या गोष्टींकडे अधिक लक्ष केंद्रित करतात.

स्व-आदर हा फक्त जातीनेच प्रभावित होतो असे नाही तर अनेक संकीर्ण घटकांच्या संमिश्रणातुन प्रभावित होतो. उदा: काही वैकासिक तज्ञांच्या मते जात आणि लिंग हे दोन्ही घटक एकत्रीतपणे स्व-आदराच्या निर्मितीवर प्रभाव पाडतात. जाती आणि लिंग यांच्या एकत्रीत प्रभावास Ethgender असे म्हटले जाते. जात (वंश) आणि लिंग यांच्या एकत्रीत अध्ययन विकास एका अभ्यासातून आफ्रिकन अमेरिकन आणि हिस्पॅनिक पुरूषांच्यामध्ये सर्वोच्च पातळीचा स्व-आदर तर एशियन आणि ह्यानिक आफ्रिकन स्त्रियांच्यामध्ये निम्न स्व-आदराची पातळी दिसून आली.

Ⓑ Identity formation: Change or Crisis? ओळखीची निर्मिती : एरिक एरिक्सन यांच्यानुसार ओळखीचा शोध हा काही किशोरांमध्ये मानसशास्त्रीय गोंधळाची स्थिती निर्माण करतो. एरिक्सन यांच्यानुसार किशोरावस्थेमध्ये ओळख विरुद्ध ओळख विषयक गोंधळ (संभ्रम) (Identity vs identity confusion) संघर्षाची स्थिती निर्माण होते. एरिक्सन यांच्या सिद्धांतानुसार किशोरावस्थेमध्ये ओळख विषयक संघर्षाची निर्मिती होते ज्यामध्ये आपल्यामध्ये काय काय अद्वितीय आणि विशिष्ट आहे हे शोधण्याचा प्रयत्न किशोर करतात. यामध्ये त्यांना काही वेळा यश मिळते. किशोरावस्थेमध्ये बोधनिक क्षमतांमधील सुधारात्मक बदलांच्या परिणामस्वरूपी त्यांना हे शक्य होते.

एरिक्सन यांच्या मते भविष्यामध्ये आपण कोणत्या भूमिका उत्तमरीत्या पार पाडू शकतो आणि आपली वैशिष्ट्ये व कुमकुवत दुवे शोधण्याकरिता किशोर प्रयत्नशील असतात. शोधाच्या या प्रक्रियेत विभिन्न भूमिका किंवा निवडी याविषयीच्या प्रयत्नांचा समावेश होतो ज्यामुळे त्यांच्या स्वतःविषयीच्या क्षमता आणि दृष्टिकोनामध्ये ते चपखल बसतात की नाही हे पाहिले जाते. या प्रक्रियेद्वारे किशोर त्यांच्या व्यक्तिगत, व्यावसायिक, लैंगिक आणि राजकीय कटिबद्धता याविषयी निवडी करून आपण स्वतः कोण आहोत हे समजून घेण्याचा प्रयत्न करतात. यालाच एरिक्सन यांनी ओळख आणि ओळखी विषयीचा संभ्रम असे म्हटले आहे.

ज्या किशोरांना योग्य ओळखी शोधण्यामध्ये अडचणी निर्माण होतात ते भिन्न मार्गांनी अभिव्यक्त होतात, जसे ते अभिव्यक्त होण्याकरिता अस्वीकारार्ह सामाजिक भूमिकांचा स्वीकार करतात किंवा त्यांना दीर्घकालीन व्यक्तिगत नातेसंबंधांच्या निर्मिती आणि व्यवस्थापनामध्ये अडचणी निर्माण होतात. थोडक्यात काय तर किशोरांच्या त्यांच्या स्व विषयक दृष्टिकोनामध्ये गोंधळाची स्थिती निर्माण होते ज्यामुळे एकसंध आणि केंद्रिय ओळख संघटित करण्यात अपयशी ठरतात.

Ⓘ Societal pressures and reliance on friends and peers: मित्र आणि समवयस्कांवरील सामाजिक दबाव आणि विश्वास : किशोरांना ओळखी विषयीचे संघर्ष तितकेसे अडचणीचे नसले तरी या टप्प्यामध्ये सामाजिक दबाव हा उच्चतम असतो. पालक आणि मित्र त्यांना वारंवार तुझी ध्येयं कोणती? पदवी नंतर तू काय करणार आहेस? असे प्रश्न विचारत असतात. माध्यमिक शिक्षणानंतर कामधंदा करायचा की महाविद्यालयीन शिक्षण घ्यायचे याविषयीचा दबाव किशोरांना जाणवतो. समजा त्यांनी काम करण्याचा निर्णय घेतला तर कोणता व्यवसाय निवडायचा हा प्रश्न उरतोच. विकासाच्या या टप्प्यादरम्यान किशोरांचे शैक्षणिक वेळापत्रक जवळपास निश्चित असते. परिणामी किशोरांचे शैक्षणिक मार्गक्रमण वैश्विक असते. हा प्रवास माध्यमिक शाळेनंतर संपतो इथे मात्र भविष्यातील निवडींबाबत किशोरांचा मार्ग खडतर बनतो.

या टप्प्यादरम्यान मानसिक्लोस म्हणून मित्र आणि समवयस्क यांच्यावरती अवलंबून राहतात. यावेळी पालकांवरील त्यांचे अवलंबित्व मात्र कमी होते. समवयस्कांवरील अतिरिक्त अवलंबित्वातून घनिष्ठ नातेसंबंधांची निर्मिती होते. इथे स्वतःची तुलना इतरांशी केल्याने त्यांना स्वतःची ओळख स्पष्ट करण्यामध्ये मदत होते.

समवयस्कांवरील विश्वास हा त्यांना स्वतःविषयीची ओळख स्पष्ट करण्यात व नातेसंबंध निर्माण करण्यास मदतीचा

ठरतो. सध्याची मनोसामाजिक विकासाची अवस्था व पुढील अवस्था या दोहोंमध्ये एक दुवा म्हणून हा विश्वास काम करतो. किशोरावस्थेच्या नंतरच्या पूर्व प्रौढावस्थेच्या अवस्थेमध्ये जवळीकता विरुद्ध एकाकीपणा (Intimacy vs isolation) संघर्ष एरिकसन यांनी सांगितला. ओळखीच्या निर्मिती मध्ये लिंगभेदाशी हा विषय निगडीत आहे. एरिकसन यांच्या मते स्त्री आणि पुरुष ओळख आणि ओळखी विकासाच्या संभ्रमास भिन्न पद्धतीने सामोरे जातात. त्यांच्या मते या अवस्थेस पुरुष हे सामाजिक विकासाच्या रुपात सामोरे जातात. परिणामी इतर व्यक्तींशी घनिष्ठ नातेसंबंध जोडण्यापूर्वी ते स्थिर ओळख विकसित करतात. याविरुद्ध स्त्रिया मात्र पहिल्यांदा घनिष्ठ नात्यांची निर्मिती करतात व नंतर या नातेसंबंधाच्या आधारे ओळख स्पष्ट करण्याचा प्रयत्न करतात. एरिकसन यांनी ज्यावेळी हा सिद्धांत विकसित केला त्यावेळच्या सामाजिक परिस्थितीचे प्रतिबिंब या सिद्धांतामध्ये दिसून येते. त्यादरम्यान महिला महाविद्यालयात जात नसत, की स्वतःचे करियर करीत असत तसेच त्यांचा विवाह देखील लवकर होत असे. सध्या मात्र या अवस्थेमधील मुलांमुलींचे अनुभव विश्व आणि विचारप्रणाली जवळपास सारखेच असल्याचे दिसून येते.

(II) Psychological moratorium मानसिक अधिस्थगन (चालढकल): ओळख विरुद्ध ओळखीमधील संभ्रम या अवस्थेमधील दबावाच्या पोटी अनेक किशोर मानसशास्त्रीय चालढकली चा वापर करतात असे एरिकसन सुचवतो. " 'मानसिक अधिस्थगन हा असा कालावधी आहे ज्यादरम्यान किशोर येऊ घातलेल्या प्रौढावस्थेमधील जबाबदारी मधून वेळ काढून किंवा त्या पुढे ढकलून नवीन शक्यता तसेच विविध भूमिका शोधण्याचा प्रयत्न करतात.' उदाहरणार्थ अनेक महाविद्यालयीन विद्यार्थी एखादे वर्ष अथवा सत्र वगळून प्रवास, काम अथवा इतर काही मार्ग आहेत का या शक्यता अथवा प्राधान्यक्रमे तपासतात.

याउलट अनेक किशोर मानसिक अधिस्थगन घेऊ शकत असे नाही. काही किशोरांना आर्थिक कारणास्तव शाळेनंतर अर्धवेळ काम करावे लागते, तसेच महाविद्यालयीन शिक्षणानंतर नोकरीची वाट धरावी लागते. परिणामी त्यांना आपल्या ओळखीविषयी नवीन प्रयोग करण्याकरिता फारसा अवधी प्राप्त होत नाही. याचा अर्थ असे किशोर मानसिक दृष्ट्या बाधित राहतात का? असे काही नाही शालेय शिक्षणासोबत यशस्वीपणे अर्धवेळ नोकरी करीत असल्याचे समाधान हे एक प्रकारचे मानसिक बक्षिसच आहे.

(III) Limitations of Erikson's Theory एरिकसन यांच्या सिद्धांताच्या मर्यादा: एरिकसन यांच्या सिद्धांता विषयी घेतला जाणारा एक आक्षेप म्हणजे त्यांनी पुरुषांच्या ओळखीच्या विकास हे प्रमाण मानून त्याच्याशी स्त्रियांच्या ओळखीची तुलना केली. टीकाकारांच्या मते एरिकसन यांचा विचार हा पुरुष प्रधान विशेषतः व्यक्तिगतता (individuality) आणि स्पर्धात्मकता (competitiveness) या संकल्पनांवर आधारित आहे. कॅरोल गिलीगन (Carol Gilligan) या मानसशास्त्रज्ञांनी महिला या नातेसंबंधांच्या निर्मिती (स्थापने) तून आपली ओळख निर्माण करतात असे आपल्या सिद्धांता मधून स्पष्ट केले आहे. या दृष्टिकोनानुसार स्त्रियांच्या ओळखी मधील महत्त्वाची संकल्पना म्हणजे त्या व इतरांच्यामधील काळजी घेण्याच्या नात्यांची गुंफणी होय.

(c) Depression and Suicide : Psychological difficulties in Adolescence :

अवसाद आणि आत्महत्या : किशोरांमधील मानसिक अडथळे — जरी अधिकतर किशोर या अवस्थेमधील संघर्ष तसेच इतर आव्हानांचा कोणत्याही मानसशास्त्रीय अडथळ्यांशिवाय यशस्वीपणे सामना करीत असली तरी देखील काहींच्या बाबतीत मात्र हा कालखंड आव्हानात्मक तसेच तणावपूर्ण असतो. काहींच्या मध्ये तीव्र मानसिक समस्यांची निर्मिती होते. यापैकी दोन महत्त्वाच्या समस्या म्हणजे अवसाद आणि आत्महत्या.

(1) Adolescent depression किशोरांमधील अवसाद : खिन्नता, दुःख आणि भावनिक दृष्ट्या कोलमडणे अथवा नाराजी पासून कोणीच स्वतःहाला वाचवू शकत नाही मग याला किशोर तरी कसे अपवाद ठरतील. नातेसंबंधांचा शेवट, महत्त्वाच्या कार्यामधील अपयश, प्रियव्यक्तींचा मृत्यु या व यासारख्या घटनांमुळे तीव्र खिन्नता, वियोगाची निर्मिती होते. या प्रसंगांमध्ये अवसादाची प्रतिक्रिया ही हमखास दिली जाणारी प्रतिक्रिया असू शकते.

किशोरांमध्ये अवसादाची भावना ही कितपत आढळते? जवळपास 1/4 किंवा २५% किशोर दोन किंवा त्यापेक्षा अधिक आठवडे जाणवणारी खिन्नता किंवा निराशेची स्थिती अनुभवतात परिणामी ते त्यांच्या दैनंदिन कृती करण्याचे थांबवितात. जवळपास दोन-तृतीयांश किशोरांनी एक किंवा अनेक वेळा अशा भावनांची अनुभूती घेतल्याचे सांगितले. दुसऱ्या बाजूला अत्यंत लोक समूहातील अगदी थोड्या म्हणजेच अगदी तीन टक्के किशोरांनी तीव्र अवसादात्मक विकृती (Major depressive disorder) ज्यामध्ये तीव्र व अधिक कालावधीच्या अवसादाची अनुभूती घेतल्याचे सांगितले.

भारतामध्ये किशोरांच्या अवसादाविषयीचे संशोधन सुरु आहे. शालेय वयीन किशोरांच्या नमुन्यामध्ये २९% मुली व २३% मुलांमध्ये मानसिक विकृती त्यातही अवसादाची स्थिती असल्याचे दिसून आले. जयंथी आणि थिरुनावुक्करासु (२०१५) यांना दक्षिण भारतामधील शालेय वयीन २५% किशोरांमध्ये तुलनेने उच्च पातळीची अवसादाची स्थिती दिसून आली. २०१५ मध्ये नायर व सहकाऱ्यांनी शाळेत जाणाऱ्या १३ ते १७ वयोगटातील किशोरांचा अभ्यास केला असता जवळपास ३% मुलांमध्ये अवसाद दिसून आला. त्रिवेदी व सहकारी (२०१७) यांना २२.५% विद्यार्थी अवसादाने ग्रस्त दिसून आले. एका रिपोर्टनुसार ६.७ टक्के विद्यार्थ्यांमध्ये सौम्य अवसाद, ४.७% विद्यार्थ्यांमध्ये मध्यम अवसाद तर ५.१% विद्यार्थ्यांमध्ये गंभीर (तीव्र) अवसाद तर १४.१ टक्के विद्यार्थ्यांमध्ये भावस्थिती विकृती अथवा अडथळे असल्याचे दिसून आले. १५ ते १९ वयोगटातील किशोरांमध्ये अवसादाचे प्रमाण लक्षणीय असल्याचे दिसून आले आहे. मुलांच्या तुलनेत मुली अधिक अवसादी असल्याचे दिसून आले. जे विद्यार्थी मित्रांसमवेत वेळ व्यतीत करतात, ज्यांना कुटुंबाकडून अधिक पाठिंबा उपलब्ध होतो ते विद्यार्थी कमी प्रमाणात अवसादाने ग्रस्त होतात. मध्यम व तीव्र अवसाद ग्रस्त विद्यार्थ्यांमध्ये अपमानास्पद वागणुकीच्या सवयी दिसून आल्या. ज्या मुलांचे कुटुंबीय त्यांच्या मुलांसमवेत पुरेसा वेळ व्यतीत करीत नाहीत त्या कुटुंबांमधील मुले अवसादास बळी पडण्याची शक्यता असते.

भारतामध्ये 57 मिलियन व्यक्ती अवसादाने बाधित असल्याचे दिसून आले आहे. भारतासारख्या विकसनशील देशामध्ये जिथे शहरीकरण, विस्थापन, आधुनिकीकरण व जागतिकीकरण घडत आहे तिथे काही गतिशील सामाजिक व स्थानिक बदलांच्या परिणामस्वरूपी येणाऱ्या वर्षांमध्ये अवसादामध्ये

Scanned with CamScanner

वाढ होईल असा WHO चा अंदाज आहे.

NMHS (२०१५-१६) नुसार २०१५ मध्ये भारतामध्ये १८ वर्षांवरील २० पैकी एक व्यक्ती म्हणजेच जवळपास ५.२५% व्यक्ती अवसादाने ग्रस्त आहे. बाल्यकालिन अवसाद फैलावाचा दर हा ०.३ ते १.२% इतका आहे. 13 ते 17 वयोगटामधील ०.८% मुलांमध्ये अवसाद आढळतो असा NMHS चा अहवाल आहे. पूर्व बाल्यावस्थेमधील आघातजन्य अनुभव, वारंवार होणारे स्थलांतर, नकारात्मक जीवन घटना, शैक्षणिक परिहार किंवा अडथळे, पूर्व नातेसंबंधाच्या समस्या, मानसिक आजाराची कौटुंबिक पार्श्वभूमी याचबरोबर शाळेमधील अथवा कुटुंबामधील तणाव हे घटक मुलांमधील तसेच किशोरांमधील अवसादाशी निगडीत आहेत.

राष्ट्रीय मानसिक आरोग्य धोरण २०१४ अवसादाच्या निर्मितीमागील विविध घटक आणि परिस्थिती यांची पुनर्रचना करून कामाच्या ठिकाणी, शिक्षण व इतर क्षेत्रे याठिकाणी मानसिक आरोग्याची वाढती आणि अवसादाच्या प्रतिबंधांवर जोर दिला गेला. दारिद्र्य आणि अवसाद या दोहोंमधील नातेसंबंध पहाता या धोरणान्वये दारिद्र्य कमी करण्याकडे अधिक जोर देऊन आर्थिक विषमता कमी करून मानसिक आरोग्य सुधारण्याचा प्रयत्न केला गेला. The Rights of persons with disabilities Act 2016 अन्वये मानसिक आरोग्याच्या कक्षेमध्ये अवसादास अक्षमतेची स्थिती म्हणून गृहित धरले आहे. मानसिक आरोग्य कृती कार्यक्रम 365 (Mental Health Action Plan 365) यांनी मानसिक आरोग्य धोरणाची उद्दिष्टे स्पष्ट करणारी चौकट सांगितली आहे. याअन्वये मुलांना मानसिक दुःखाविषयी समुपदेशन उपलब्ध करून देण्याचा समावेश केला आहे.

अवसादाच्या दरामध्ये लिंग, वंश आणि धार्मिक भेदाचाही समावेश होतो. किशोरवयीन मुलांच्या तुलनेत किशोरवयीन मुलींमध्ये अवसादाचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येते. काही अध्ययनातून आफ्रिकन अमेरिकन किशोरांमध्ये गौर वर्णीय किशोरांपेक्षा अधिक प्रमाणात अवसाद असल्याचे दिसून आले आहे. स्थानिक अमेरिकन लोकांमध्ये अवसादाचे प्रमाण उच्च असल्याचे दिसून आले.

तीव्र आणि दीर्घकालिन अवसादामध्ये जैविक घटक समाविष्ट असतात. काही किशोरांमध्ये अनुवांशिक जडणघडणीच अवसादाच्या अनुभूती निर्मितीची असते. असे असले तरीही परिवेशीय तसेच सामाजिक घटक देखील महत्त्वाची भूमिका बजावताना आढळतात. जे किशोर आपल्या प्रिय व्यक्तीच्या मृत्यु अनुभवतात किंवा व्यसनी अथवा अवसादी पालक यांच्यासमवेत लहानाचे मोठे होतात अशा किशोरांमध्ये अवसादाचे प्रमाण अधिक दिसते. याचबरोबर लोकप्रिय नसणे, कमी मित्र परिवार, नाकारल्याची अनुभूती हे घटक देखील किशोरांच्या अवसादामध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात.

अवसादाविषयीच्या कोड्यामध्ये टाकणारा एक महत्त्वाचा प्रश्न म्हणजे मुलांच्या तुलनेत मुलींमध्ये अवसादाचे प्रमाण का अधिक आहे. याचा संबंध एखादे विशिष्ट जनुक अथवा संप्रेरकांमधील भेदाशी असावे परंतु याविषयी अल्प पुरावे उपलब्ध आहेत. काही मानसशास्त्रज्ञांच्या मते मुलांच्या तुलनेत मुलींमध्ये अनेक कारणांनी, तसेच संघर्ष, पारंपारिक भूमिका वठवण्याचा दबाव या कारणांनी किशोरावस्थेमध्ये तणावाचा सामना करावा लागतो. एका मुलीच्या मुलाखतीमध्ये तीने सांगितले की, तिला फक्त शाळेमध्येच उत्तम निष्पादन करण्याचा दबाव नाही तर याचबरोबर तिला लोकप्रिय देखील बनायचे आहे. पारंपारिक लिंग भूमिका ह्या स्त्रियांच्या तुलनेत पुरुषांच्या

उच्च दर्जाचे असल्याचे दिसून येते.

किशोरावस्थेदरम्यान मुलींच्यामध्ये अवसादाचे प्रमाण उच्च असल्याकारणाने तणावाशी लढताना स्त्रियांचे विकास होत असावा. मुलांच्या तुलनेत मुली अधिक अंतर्मुख होऊन प्रतिक्रिया देतात परिणामी असाहाय्यता आणि नैराश्याची अनुभूती त्यांच्यामध्ये अधिक असते. याउलट मुले तणावापूर्ती अधिक बहिर्गत पद्धतीने प्रतिक्रिया देतात परिणामी आक्रमकता, आक्रमकता, मद्यपान अथवा इतर मादक पदार्थांचे सेवन इ. मार्गांचा अवलंब करतात.

(II) Adolesient Suicide: किशोरांची आत्महत्या: भारतामध्ये National Crime Records Bureau यांनी पोलिसांकडून आत्महत्या विषयक नोंदी गोळा केल्या त्यामध्ये 18 ते 30 वयोगटातील तरुण हे आत्महत्येसाठी अधिक प्रमाणात विचलीत असल्याचे दिसून आले. एकूण आत्महत्यांपैकी जवळपास 33% आत्महत्या या वयोगटातील होत्या. 2015 मध्ये एकूण आत्महत्येच्या 28% आत्महत्या ह्या कौटुंबिक समस्यांमुळे तर 16% आत्महत्या या आजारपणामुळे झाल्याचे दिसून आले. एकूण आत्महत्यांपैकी 68.5% पुरुष व 31.5% स्त्रिया असल्याचे दिसून आले.

US मध्ये किशोरांच्यामधील आत्महत्येच्या एकूण प्रमाणामध्ये मुलींच्या तुलनेत मुलांमध्ये आत्महत्येचे प्रमाण उच्च असल्याचे दिसून आले आहे. मुली आत्महत्येचा प्रयत्न अधिक प्रमाणात करतात. तथापी मृत्यूचे प्रमाण हे मुलांमध्ये अधिक आहे. याचे कारण म्हणजे आत्महत्येसाठी निवडला जाणारा मार्ग हा अधिक हिंसक जसे बंदुकांचा वापर, इ. तुलनेने मुली कमी हिंसक मार्गांचा वापर करतात जसे विषारी औषध प्राशन करणे इ. परिणामी मुलांना वाचवण्याची संधी अल्प असते याउलट मुलींना वाचवणे शक्य होते.

मागील दशकामधील किशोरांच्या वाढत्या आत्महत्यांमागची कारणे अस्पष्ट आहेत. यामागचे सर्वमान्य असे एक कारण म्हणजे किशोरवयीन मुले अनुभवत असणारा तणाव (ताण) यामध्ये झालेली वाढ. या तणावाला अधिक प्रमाणात विचलीत असणारी मुले आत्महत्येचा प्रयत्न करतात. परंतु फक्त किशोरांमधील तणाव का वाढतोय? कारण याच कालखंडामध्ये मात्र इतर वयोगटातील आत्महत्येचे प्रमाण स्थिर आहे. याविषयी निश्चित अशी कारणे जरी देता येत नसली तरी देखील काही विशिष्ट घटकांची उपस्थिती मात्र आत्महत्येचे प्रमाण अथवा धोका वाढवत आहेत हे स्पष्ट आहे. यापैकीच एक घटक म्हणजे अवसाद होय. अवसादी तरुण जे तीव्र अथवा आत्यंतिक स्वरूपाची निराशा अनुभवत आहेत त्यांच्यामध्ये आत्महत्या करण्याचा धोका अधिक आहे. याव्यतिरिक्त सामाजिक प्रतिबंध, परिपूर्णता आणि चिंता, तणावाची उच्चतम पातळी हे घटक देखील आत्महत्येच्या वाढत्या धोक्याशी निगडीत आहेत. शस्त्रांची सहजरीत्या होणारी उपलब्धता हा घटक देखील आत्महत्येचा दर वाढवण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावतो.

अवसादाव्यतिरिक्त कौटुंबिक संघर्ष, नातेसंबंध किंवा शालेय अडथळे हे घटक देखील काही आत्महत्यांपाठीमागील महत्त्वाचे घटक म्हणून समोर आले आहेत. तर इतर काही प्रकरणांमध्ये दुरुपयोग (कठोर वर्तन, छळ) आणि दुर्लक्ष हे घटक महत्त्वाचे होते. मादक पदार्थ व मद्य सेवन करणाऱ्या व्यक्तींमध्ये आत्महत्येचा दर उच्च असल्याचेही दिसून आले.

इतर व्यक्तींच्या आत्महत्येचा सामना झालेल्या व्यक्तींनीही आत्महत्या केल्याची काही प्रकरणे आहेत. समूह आत्महत्या (cluster suicide) मध्ये एकाची आत्महत्या इतरांना आत्महत्या

करण्यास उद्युक्त करतात.

आत्महत्येची शक्यता प्रदर्शित करणाऱ्या धोक्याच्या सूचना किंवा इशारे पुढीलप्रमाणे:

- आत्महत्येविषयी प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष बोलणे. मी मेलो तर बरे होईल.
- शालेय अडचणी, शाळेतील अनुपस्थिती, शैक्षणिक प्रगतीमध्ये घट.
- जणू काही दीर्घकालिन कालावधीसाठी कुठेतरी जात आहोत अशी व्यवस्था करणे. जसे पाळीव प्राण्यांसाठी पर्यायी व्यवस्था करणे, व्यवसायाचा, नोकरीचा त्याग करणे.
- मृत्युपत्र लिहिणे
- क्षुधाभाव (भूक न लागणे) किंवा अतिखाणे
- सामान्य अवसाद परिणामी झोपेच्या आकृतिबंधात बदल, मंदगती, सुस्ती, कमी किंवा अल्प बोलणे.
- वर्तनात नाट्यमय बदल जसे लाजरी व्यक्ती अचानक सामाजिक होणे.
- संगीत, कला किंवा साहित्य याद्वारे मृत्युविषयीच्या विचारात मग्न असणे इ.

## 3.2 Relationships : Family and friends नातेसंबंध : कुटुंब आणि मित्र —

लहान मुलांच्या तुलनेत किशोरांचे सामाजिक विश्व हे अधिक विस्तृत असते. किशोरांचे जसजसे कुटुंबाबाहेरील व्यक्तिसमवेत नातेसंबंध विकसित व्हायला लागतात तसतसे त्यांचे कुटुंबासोबतच्या आंतरक्रिया नवीन वळणावर कधीकधीतर अवघड, तणावपूर्ण बनतात.

### (A) Family ties : changing relations with relations कौटुंबिक संबंध :

यश ने जेव्हा माध्यमिक शाळेमध्ये प्रवेश केला तेव्हा त्याचे त्याच्या पालकांशी असणाऱ्या नात्यामध्ये नाट्यमय बदल झाले. चांगल्या नात्याची जागा तणावपूर्ण संबंधाने घेतली होती. त्याच्यामतानुसार वयाच्या 13 वर्षापासूनच त्याला मोकळीक मिळायला हवी आणि जो त्याचा हक्क आहे. मोकळीक द्यायच्या ऐवजी पालक त्याच्यावर अधिक बंधने लादत आहेत.

यश ज्याप्रमाणे गोष्टींकडे पहातो आहे त्यापेक्षा वेगळ्या पद्धतीने त्याचे पालक पहात आहेत. घरातील तणावास आपण कारणीभूत नाही आहोत हे ते सुचवित आहेत. त्यांच्या मते यशमुळे तणावाची स्थिती निर्माण झाली आहे. त्यांनी यश सोबत लहानपणापासूनच घनिष्ठ, स्थिर, व प्रेमळ नात्याची निर्मिती केलेली आहे ज्यामध्ये आता अचानक बदल झाला आहे. त्यांच्या दृष्टीने यशने त्यांना त्याच्या आयुष्यापासून बेदखल केले आहे. तो तेव्हाच त्यांच्या पालकांशी बोलतो, जेव्हा त्यांच्या सवयी, विचार पेहराव, टीव्हीवरील आवडीनिवडी याविषयी टीकाटिप्पणी करायची असेल. पालकांच्या दृष्टीने यशाचे वर्तन हे निराशाजनक व गोंधळात टाकणारे आहे.

### (B) The quest for autonomy स्वायत्ततेचा शोध :

किशोरांच्या वर्तनामुळे पालक कधीकधी संतप्त होतात तर अधिकतर वेळा गोंधळात किंवा कोड्यात पडतात. ज्यामुळे पूर्वी पालकांचे निर्णय, मार्गदर्शक तत्त्वे स्वीकारत होती ती आता प्रतिप्रश्न करू लागतात. काही वेळा तर याप्रती बंड करून उठतात.

Scanned with CamScanner

किशोरावस्थेदरम्यान पालक व मुलांच्या बदलत्या भूमिकांच्या परिणामस्वरूपी त्या संघर्षाची निर्मिती होते. किशोरांना त्यांच्या आयुष्यावर स्वतःचे नियंत्रण, अधिकची स्वायत्तता व स्वातंत्र्य अथवा मोकळीक हवी असते. किशोरावस्थेमधील हा बदल हा एक वैकासिक टप्पा आहे. परिणामी हा बदल हे स्वाभाविक लक्षण आहे असा विचार करून अधिकतर पालक या बदलांचे स्वागत करतात. तथापि दिवसेंदिवस वाढत जाणारी त्यांची स्वायत्तता अथवा त्याची मागणी ही पालकांकरिता डोकेदुखी बनते. बौद्धिक दृष्ट्या त्यांची वाढती स्वायत्तता समजून घेणे आणि पालकांच्या अनुपस्थितीत एखाद्या पार्टीस उशीर राहण्यास परवानगी देणे या दोन गोष्टी भिन्न भिन्न आहेत. मुलांच्या दृष्टीने पालकांनी संमती न देणे म्हणजे त्यांच्यावर अविश्वास दाखवण्यासारखे आहे. परंतु पालकांच्या दृष्टीने माझा तुमच्यावर विश्वास आहे परंतु तेथे उपस्थित असणाऱ्या इतर व्यक्ती मुळे मला काळजी वाटते.

अधिकतर कुटुंबामध्ये किशोरांची स्वायत्तता त्यांच्या विकासासोबत वाढत जाते. किशोरांच्या वाढत्या स्वायत्ततेच्या परिणामस्वरूपी पालक आणि किशोर यांच्यामधील नात्यामध्ये बदल होतो. किशोरावस्थेच्या सुरुवातीस पालक मुलांवर आपला प्रभाव आणि ताबा टिकवून असतात तर किशोरावस्थेच्या शेवटापर्यंत ही सत्ता आणि प्रभाव अधिक संतुलित होतो म्हणजेच समसमान होतो. जरी पालक थोडेसे वरचढ होण्याचा प्रयत्न करीत असतात तरीदेखील सत्ता आणि प्रभाव हा वाटून घेतला जातो.

(II) Culture and autonomy / संस्कृती आणि स्वायत्तता :

प्रत्येक कुटुंब आणि प्रत्येक मुलांमध्ये स्वायत्ततेचे प्रमाण बदलत जाते. सांस्कृतिक घटक महत्त्वाची भूमिका बजावतात. पाश्चिमात्य संस्कृतींमध्ये व्यक्तिस्वातंत्र्याला किंवा व्यक्तिवादाला महत्त्व दिले जाते तेथे किशोरांना किशोरावस्थेच्या सुरुवातीच्या टप्प्यावरच स्वायत्तता प्राप्त होते. याउलट आशियाई संस्कृती ह्या समूह अथवा सामूहिकतावास प्राधान्य दिले जाते. यांच्यामते व्यक्तिगत सुस्थिती अथवा कल्याणापेक्षा समूहाची सुस्थिती महत्त्वाची आहे. अशा संस्कृतीमध्ये किशोरांच्या महत्त्वाकांक्षेविषयी कमी बोलले जाते.

विभिन्न सांस्कृतिक पार्श्वभूमीच्या किशोरांमध्ये कुटुंबाप्रतिच्या बांधिलकी अथवा कर्तव्यामध्ये भेद असल्याचे दिसून येते. सामूहिकतावास प्राधान्य देणाऱ्या संस्कृतीमध्ये कुटुंबाप्रतिची बांधिलकी अधिक प्रमाणात आढळते. यामध्ये अपेक्षांची पूर्ती करणे, सहाय्य करणे, आदर व्यक्त करणे, भविष्यामध्ये कुटुंबाला आधार देणे इ. कर्तव्यांचा समावेश होतो. समुदाय संस्कृतीमध्ये स्वायत्ततेवर अधिक जोर दिला जात नाही परिणामी यांच्यामध्ये स्वायत्ततेचा विकास संथगतीने होतो. उदा: किशोरांनी एखादे विशिष्ट वर्तन कधी असे पालकांना व किशोरांना विचारल्यास याचे उत्तर त्यांच्या सांस्कृतिक पार्श्वभूमीनुसार बदलते. उदा: एखाद्या कार्यक्रमात एकटे जाणे.

सामुदायिक संस्कृतीमध्ये स्वायत्ततेस दिली जाणारी उशिराच्या परवानगीचा किशोरांवर नकारात्मक प्रभाव पडतो का? याचे उत्तर नाही असे आहे. सांस्कृतिक अपेक्षा आणि वैकासिक आकृतिबंध यामध्ये कितपत सारखेपणा अथवा मिळतेजुळतेपणा आहे हा एक महत्त्वाचा घटक आहे. स्वायत्ततेचा विकास सामाजिक अपेक्षांशी किती चांगल्या पद्धतीने जुळून होतो हा घटक सर्वाधिक

Scanned with CamScanner

महत्वाचा ठरतो.

स्वायत्ततेस प्रभावित करणारा आणखी एक घटक म्हणजे लिंग होय. सर्वसाधारणपणे किशोरवयीन मुलींच्या तुलनेत मुलांना अधिक लवकर स्वायत्तता दिली जाते. पुरुषांना अधिक स्वावलंबी तर स्त्रियांना परावलंबित्वाच्या रूपात पाहिले जाते. पुरुषप्रधानतेची व पारंपारिक संस्कृतीबद्दल ता पालकांमध्ये जेवढी अधिक तेवढी मुलींना स्वायत्तता देण्यास अधिक टाळाटाळ केली जाते.

(III) The myth of the generation gap: पिढ्यांमधील अंतर : दंतकथा —

किशोरवयीन मुलांवरील आधारित चित्रपटांमध्ये किशोर आणि त्यांचे पालक यांचे विश्वाविषयीची मते बरोबर विरुद्ध असतात असे चित्र रेखाटले जाते. उदा. पर्यावरणाविषयी, प्रदूषणाविषयी अधिक सजग असणाऱ्या, जनजागृती करणाऱ्या किशोरांच्या वडिलांच्याच कारखाना असतो जो प्रदूषणात भर घालतो. या प्रकारचे अतिशयोक्तीकरण नेहमीच गमतीशीर असते. या सर्वांचा सार एकच आहे तो म्हणजे पालक व किशोर घटनेकडे वेगळ्या पद्धतीने पाहतात. या वरून 'पिढ्यांमधील अंतर' ही संकल्पना उदयास आली. 'अभिवृत्ती, मूल्ये, महत्त्वाकांक्षा आणि विश्वाविषयीचे दृष्टिकोन याबाबत पालक आणि मुले यांच्यामध्ये मोठा भेद असणे याला पिढ्यांमधील अंतर असे म्हटले आहे.'

वस्तुतः याविषयीचे वास्तव मात्र वेगळे आहे. जेव्हा पिढ्यांमधील अंतर निर्माण होते त्यावेळी त्यामधील भेद हा मर्यादित स्वरूपाचा किंवा त्याचे प्रमाण अल्प असते. विविध मुद्द्यांबाबत किशोर आणि पालक यांची मते जवळपास सारखी असतात. प्रजासत्ताक अथवा लोकशाही विचारांच्या पालकांची मुले लोकशाही विचारांची असतात. धार्मिक विचारांच्या पालकांची मुले धार्मिक विचारांना प्राधान्य देणारी असतात. सामाजिक, राजकीय आणि धार्मिक मुद्द्यांबाबत पालक व बालक हे दोघेही समकालीन असल्याचे आढळते. मुलांना महत्त्वाच्या वाटणाऱ्या सामाजिक समस्यांशी अधिकतर पालक सहमत असतात.

पालक-बालक नातेसंबंधामध्ये स्वायत्तता आणि स्वातंत्र्य याविषयीचा संघर्ष असला तरीदेखील अधिकतर किशोरांच्यामध्ये त्यांच्या पालकांविषयी प्रेम, स्नेहभाव आणि आदर असल्याचे दिसते शिवाय पालक देखील त्यांच्या मुलांप्रती हेच भाव प्रदर्शित करीत असल्याचे दिसते. जरी काही पालकांचे आणि किशोरांचे नाते अतिशय बिघडलेले असले तरी देखील अधिकतर नातेसंबंध हे धनात्मक स्वरूपाचे असतात व मुलांना समवयस्कांचा दबाव हाताळण्यास सहाय्यक ठरणारे असतात.

असे असले तरीदेखील सर्वसाधारणपणे किशोरवयीन मुले आपल्या पालकांसमवेत अल्पवेळ व्यतीत करीत असतात. तथापि प्रत्येक पालकासमवेत व्यक्तिगत पातळीवर व्यतीत केला जाणारा वेळ मात्र स्थिर राहतो. थोडक्यात किशोरवयीनकाळात कौटुंबिक समस्या ह्या अतिशय तीव्र पातळीवर असतात याविषयी समाधानकारक असे पुरावे उपलब्ध नाही आहेत.

(IV) Conflicts with Parents

पालकांशी संघर्ष : अधिकतर वेळा पालक आणि किशोर या दोघांमधील संबंध सौहार्दपूर्ण असतात तर काही वेळा यांमध्ये संघर्ष सुद्धा पहावयास मिळतात.

कोणतेही नाते हे नेहमीच गोड आणि तणावविरहित नसते. सामाजिक आणि राजकिय मुद्द्यांवर पालक आणि किशोरांची अभिवृत्ती, दृष्टिकोण जरी सारखे असले तरीही व्यक्तिगत आवडी-निवडी जसे पोषाख, खाणे-पिणे, संगीत इ. बाबतीत मात्र मतभेद असतात. तसेच मुले जेव्हा स्वायत्तता प्राप्त करण्याचा प्रयत्न करतात तेव्हा देखील त्यांच्यामध्ये संघर्षाचा उद्भव होतो. किशोरावस्थेच्या तुलनेत पालक आणि किशोरांमधील संघर्ष निर्माण होण्याची शक्यता अधिक असते. तथापी सर्वच कुटुंबामध्ये सारख्याच प्रमाणे संघर्ष निर्माण होईल असे नाही.

किशोरावस्थेच्या शेवटच्या टप्प्यापेक्षा सुरुवातीलाच अधिक संघर्ष का निर्माण होतो? ज्युडीथ स्मेटाना या वैकासिक मानसशास्त्रज्ञांच्या मते योग्य आणि अयोग्य वर्तन म्हणजे न्याय व सापाठीमागच्या तर्क कोणता या कारणावरून संघर्ष उद्भवतो. उदा:- एखाद्याने एकाच कानास तीन ठिकाणी टोचून घेणे हे अयोग्य आहे कारण समाजाच्या नजरेतून हे चुकीचे आहे तथापी याकडे किशोरवयीन मुले व्यक्तिगत आवडीनिवडीच्या रूपात पाहतात.

संघर्षाची निर्मिती होण्यासाठी युक्तिवाद आणि आग्रहीपणा या दोन घटकांची भूमिका महत्वाची असते तथापी हे गुण पालक आणि बालक या दोहोमधील नातेसंबंध विकसित करण्यामध्ये देखील महत्वाची भूमिका बजावतात. सुरुवातीला किशोरांकडून निर्माण केल्या जाणाऱ्या आव्हानांना पालक सावधपणे प्रतिक्रिया देतात परिणामी त्यांच्यामध्ये अलवचिकता व ताठरपणा दिसतो परंतु आपली मुले आता मोठी होत आहेत आणि बदलाच्या या प्रक्रियेमध्ये आपण त्यांना पाठिंबा दिला पाहिजे याची पालकांना जाणीव होते.

आपल्या किशोरवयीन मुलांकडून केला जाणारा युक्तिवाद हा लक्षवेधक तसेच फार काही अतार्किक नसतो असतो त्यामुळे आपल्या मुलावर, मुलीवर विश्वास ठेवून त्यांना मोकळेपणा द्यायला हरकत नाही याची पालकांना जाणीव होते त्यामुळे ते नमते घ्यायला लागतात, परवानगी देतात व त्यांच्यास अधिक प्रोत्साहित करतात.

Ⓥ <u>Cultural differences in parent-child conflicts during adolescence</u>

पालक-बालक संघर्षांमधील सांस्कृतिक भेद: पालक-बालक संघर्ष हा जरी सर्वच संस्कृतीमध्ये आढळत असला तरीही पारंपारिक तसेच औद्योगिकीकरणाच्या पूर्वीच्या संस्कृतींमध्ये पालक आणि बालकांमध्ये फारसा संघर्ष झालेला पहावयास मिळत नाही. या संस्कृतीमधील मुलांना धोकादायक वर्तन करण्याची तसेच भावनांमध्ये आंदोलनाची भिन्न अनुभूती होते.

असे का? याचे उत्तर किशोर कितपत स्वातंत्र्य गृहित धरतात किंवा अपेक्षित असते व पालक कितपत परवानगी देतात. औद्योगिकीकरण संस्कृतीमध्ये व्यक्तिवादाचे मूल्य उच्च असते परिणामी किशोरांच्या दृष्टिने स्वातंत्र्य अपेक्षित असते. त्यामुळे देऊ केल्या जाणाऱ्या स्वातंत्र्या संदर्भात पालक व बालकांमध्ये वाटाघाटी होतात त्याच्यामुळे संघर्ष वाढतो.

याउलट पारंपारिक समाजामध्ये व्यक्तिवादाला तितकेसे महत्व दिले जात नाही परिणामी या संस्कृतीमधील किशोर स्वातंत्र्याला मुकणे मान्य करतात. त्यामुळे इथे अल्प संघर्ष पहावयास मिळतो.

भारतामध्ये सामाजिक आणि गृहकार्य यासारख्या कार्यावर पालकांचे अधिक नियंत्रण आहे असे किशोरवयीन मुलींना वाटते तर मुलांच्या दृष्टिने शैक्षणिक कार्यावर पालकांचे अधिक नियंत्रण होते विभक्त कुटुंबातील मुलांपेक्षा एकत्रित कुटुंबातील मुलांना सामाजिक कार्यावर अधिक नियंत्रण पालकांचे

असल्याचे म्हणणे होते. सक्सेना व सहकारी (२०११) यांनी मध्यमवर्गीय आणि कनिष्ठवर्गीय पालक बालक नातेसंबंधामधील भेद यांचा अभ्यास केला असता मध्यमवर्गीय कुटुंबामध्ये शालेय विषयक मतभेद तर कनिष्ठ वर्गातील कुटुंबामध्ये कौटुंबिक तसेच समाजाविषयक मुद्द्यांवर असहमती, मतभेद दिसून आले.

(B) Relationships with peers : The importance of belonging

समवयस्कांशी नातेसंबंध : पालकांच्या नजरेतून किशोरांकरिता तंतोतंत लागू पडणारे प्रतीक म्हणजे सेल फोन (मोबाईल) ज्याद्वारे प्रचंड प्रमाणातील संदेशांची देवाणघेवाण केली जाते. अनेक पालकांची मुले, मुली यांना मित्रमैत्रिणींशी संपर्क साधणे जीवनातील अपरिहार्य गोष्ट असते.

समवयस्कांशी अथवा मित्रांशी संपर्क साधणे त्यांच्याकरिता जणूकाही बंधनकारकच असते यावरून किशोरावस्थेमधील समवयस्कांची भूमिका अधोरेखित होते. किशोर समवयस्कांसोबत अधिक प्रमाणात वेळ व्यतीत करतात ज्याद्वारे समवयस्कांमधील नातेसंबंध वाढीस लागतात. जीवनातील असा कोणताही कालखंड नाही ज्यामध्ये किशोरावस्थेइतका समवयस्कांच्या नातेसंबंध महत्त्वाचा असतो.

बकाया (Bakaya, २०१२) यांनी भारतामधील किशोरांचा अभ्यास केला. त्यांच्या मुलाखतीतून नातेसंबंध हे पारस्परिक स्वरूपाचे असावेत आणि आपल्या भावना, दृष्टिकोण यामध्ये समवयस्क आणि मित्रांचा दृष्टिकोण महत्त्वाचा असल्याचे समजले. जवळीकतेची गरज देखील किशोरांच्यामध्ये महत्त्वाची असल्याचे दिसून आले. 'आम्ही सगळ्या गोष्टी एकमेकांना सांगतो, आम्ही एकमेकांशी खूप घनिष्ठरित्या जोडलो गेलेलो आहोत' असे किशोरांनी सांगितले.

(I) Social comparison सामाजिक तुलना : किशोरावस्थेदरम्यान अनेक कारणांनी समवयस्क अधिक महत्त्वाचे बनतात. यापैकी एक कारण म्हणजे या संबंधांमुळे त्यांना आपली मते, क्षमता, शारीरिक बदल यांची तुलना करण्याची संधी मिळते. या प्रक्रियेस सामाजिक तुलना असे म्हणतात. पूर्व किशोरावस्थेदरम्यान शारीरिक आणि बोधनिक बदलांची गती इतकी तीव्र असते की त्यांना याविषयी समवयस्कांशी चर्चा करणे किंवा आपल्या भावना, अनुभवांचे आदानप्रदान करणे गरजेचे वाटते.

किशोर पालकांशी तुलना करू शकत नाहीत याचे कारण म्हणजे एकतर पालक हे या बदलांच्या पलीकडे गेलेले असतात. शिवाय किशोर त्यांच्या स्वायत्ततेसाठी पालकांशी संघर्ष करीत असतात त्यामुळे माहिती मिळविण्याचा हा एक अयोग्य स्रोत ठरतो.

(II) Reference groups संदर्भ समूह : किशोरावस्था हा नाविन्यपूर्ण प्रयोग करण्याची, नवीन ओळखी, भूमिका आणि वर्तन आत्मसात करण्याचा कालावधी म्हणून ओळखला जातो. कोणत्या भूमिका आणि वर्तन हे अधिक स्वीकारार्ह आहे याविषयीची माहिती समवयस्क संदर्भ समूहाद्वारे प्राप्त करतात. 'संदर्भ समूह हा व्यक्तींचा समूह आहे ज्याच्याशी आपण तुलना करू शकतो.' ज्याप्रमाणे एखादा खेळाडू दुसऱ्या एखाद्या खेळाडूच्या स्कोअरशी आपली तुलना करतो त्याप्रमाणे किशोर आपल्या सारख्या स्तरांशी तुलना करतात.

संदर्भ समूह हे मानदंड, प्रमाणके यांचा संच पुरवितात ज्याच्या आधारे किशोर त्यांच्या क्षमता आणि सामाजिक यशाची पडताळणी करतात. एखाद्या समूहाचे सदस्य नसताना देखी

तो समूह एखाद्या किशोरासाठी संदर्भाच्या स्थान कार्य करतो. उदा. अलोकप्रिय किशोरास लोकप्रिय समूहाकरिता किशोर नाकारतात इथे हा लोकप्रिय समूह संदर्भसमूह म्हणून वापरला जातो.

(III) Cliques and crowds: Belonging to a group कुंपू आणि गर्दी : समूहाशी जोडले जाणे :- बोधनिक प्रगतीच्या परिणामस्वरूपी किशोर इतरांना भिन्न भिन्न समूहांमध्ये विभागू शकतात. किशोरवयीन मुल विविध समूहांचे सदस्य असतात. किशोरवयीनांचे दोन प्रकारचे समूह असतात पहिला म्हणजे clique कुंपू आणि दुसरा crowd गर्दी (जमाव). 'दोन ते बारा (१२) व्यक्तींपासून बनलेला समूह ज्यांच्यामध्ये वारंवार सामाजिक आंतरक्रिया घडत असतात त्या समूहास कुंपू किंवा टोळके असे म्हणतात. याउलट गर्दी किंवा जमावामध्ये एखादे विशिष्ठ गुणवैशिष्ट्य धारण करणाऱ्या व्यक्तींचा समावेश होतो ज्यांच्यामध्ये आंतरक्रिया घडलीच असे नाही. गर्दी किंवा जमाव हा मोठा असतो. उदा. सारख्या अभिवृत्ती धारण करणाऱ्या व्यक्तींचा गट जसे निसर्ग संवर्धन, गप्पाटप्पा इ.

कुंपू किंवा जमावामधील सभासदत्व हे समूह सदस्यांमध्ये किती सारखेपणा आहे यावर निर्धारित होते. यामध्ये एक महत्त्वाचा पैलु म्हणजे मादक पदार्थांचे सेवन (वापर). किशोर अशा व्यक्तींची मित्र म्हणून निवड करतात जे मद्याचा अथवा इतर मादक पदार्थांचा वापर करतात. याचबरोबर शैक्षणिक यश, धार्मिकता सारख्या असणाऱ्या किशोरांचा समूह बनू शकतो, अधिक आक्रमकपणे अथवा वेगळ्या पद्धतीने वागणाऱ्या मुलांचे आकर्षण अधिक प्रमाणात निर्माण होऊ शकते. परिणामी अशा वैशिष्ट्यांचा समूह बनतो.

कुंपू अथवा गर्दीमधील भेद हा किशोरांच्या बोधनिक क्षमतांवर अवलंबून असतो. समूहाची नावे अमूर्त स्वरूपाची, नाविन्यपूर्ण असतात. ज्यांच्या बद्दल प्रत्यक्ष ज्ञान नाही अथवा ज्यांच्याशी ते अगदी कमी आंतरक्रिया करतात अशा व्यक्तीविषयी निर्णय घेणे गरजेचे बनते.

(IV) Gender Relations लिंग संबंध : मध्य बाल्यावस्थेमधून मुलं जेव्हा किशोरावस्थेत येतात तेव्हा सर्वच ठिकाणी जवळपास त्यांच्याच लिंगाच्या मित्रांचा समूह तयार होतो. मुले मुलांमध्ये तर मुली मुलींच्या समूहामध्ये रमतात. या लिंग विभक्ततेला लिंगामधील फूट चले म्हणतात.

दोन्ही लिंगामधील सदस्य हे तारुण्यावस्थेत (यौवनात) पदार्पण करीत असल्याने परिस्थितीतील हा बदल घडतो. मुले आणि मुली या अवस्थेमध्ये दबाव अथवा संप्रेरकांच्या महापूर अनुभवतात ज्यामुळे परिपक्वता आणि लैंगिक इंद्रियांचा विकास घडतो. याचवेळी प्रणयी नात्यासाठी हीच योग्य वेळ आहे यासाठीचा सामाजिक दबाव वाढीस लागतो. या विकासाच्या परिणामस्वरूपी किशोर विरुद्ध लिंगाच्या किशोराकडे वेगळ्या दृष्टीने पाहू लागतात. भिन्नलिंगी किशोर एकमेकांमध्ये लैंगिक आणि व्यक्तिमत्त्व दृष्ट्या अधिक रुची घेऊ लागतात. किशोरवयीन मुले अथवा मुली आपला सर्वाधिक वेळ समान लिंगाच्या व्यक्तिसमवेत व्यतीत करीत असल्या तरीदेखील ते मुलां-मुलींच्या एकत्री पार्टीला उपस्थित राहू लागतात.

किशोर आपला अधिकाधिक वेळ भिन्नलिंगी व्यक्तीसमवेत घालवतात. कुंपूमध्ये मुलं, मुली अशा दोन्ही लिंगांचा समावेश होतो. सुरुवातील सारख्या लिंगाच्या असणारा कुंपू नंतर मिश्र लिंगांचा बनतो. कधी कधी वाढत्या जोड्यांमुळे हा कुंपू कमी प्रभावी होतो व विभाजित होतो अथवा नष्ट होतो.

Scanned with CamScanner

## 3.3 Dating and Sexual behavior डेटिंग आणि लैंगिक वर्तन :

जवळपास एक महिन्याप्रती वतनने धाडस करून पद्मजाला पिक्चर पहाण्यास येशील का असे विचारले. खरे पहाता पद्मजा करिता हा आश्चर्याचा धक्का नव्हता कारण आपण तिला बाहेर घेवून जाणार आहोत हे मानस वतन ने त्याचा मित्र रमेश यास सांगितले होते आणि रमेश ने हि गोष्ट पद्मजाचा मित्र राहूल यास बोलली होती, त्यामुळे राहूल ने लुडद्यायाविषयीची कल्पना पद्मजाला दिली होती त्यामुळे जेव्हा प्रत्यक्ष वतन ने पिक्चर विषयी विचारणा केली त्यावेळी पद्मजा ने त्यास होकार दिला.

डेटिंग चे विश्व अतिशय संकीर्ण आहे. किशोराकरिता नव्याने निर्माण झालेली आणि महत्वपूर्ण अशी ही आचारपद्धती आहे.

### (A) Dating and Sexual relationship in the twenty first century :

एकविसाव्या शतकातील डेटिंग आणि लैंगिक नातेसंबंध : किशोर कधी आणि कसे डेटिंग करण्यास प्रारंभ करतील याचे निर्धारण सांस्कृतिक घटकांवर अवलंबून असते जे एका पिढी-पासून दुसऱ्या पिढीपर्यंत बदलत असतात. सांस्कृतिक आदर्शानुसार नुकतेच, प्रामाणिकपणे फक्त एका व्यक्तीशी डेट करण्याकडे प्रणयाच्या संदर्भाने पाहिले जाते. किशोरांमधील डेटिंगला समाज अनेकदा प्रोत्साहित करताना दिसतो याद्वारे नात्यांचा बंध विकसित करून त्याचा हा प्रवास विवाहापर्यंत पोहचावा ही अपेक्षा असते. डेटिंग ही संकल्पना सध्या कालबाह्य झाली आहे व त्यास मर्यादित अर्थ आहे असा काही किशोरांचा विश्वास आहे. काही ठिकाणी तर ही रीत ही फक्त Hooking up चाच प्रधान समजली गेली आहे. Hooking up ही अस्पष्ट अथवा संदिग्ध संज्ञा आहे ज्यामध्ये चुंबनापासून ते लैंगिक आंतरक्रियेपर्यंतच्या सर्वच क्रियांचा समावेश होतो. बदलत्या सांस्कृतिक मानदंडांशिवाय डेटिंग हा किशोरांमधील जवळिकता वाढविणारा तसेच सामाजिक आंतरक्रिया विकसित करणारा प्रभावी मार्ग असल्याचे दिसून येते.

### (B) The functions of dating : डेटिंगची कार्ये :

डेटिंग हा जरी वरकरणी विवाहाकडे नेणारा प्रणयधारणेचा कालावधी वाटत असला तरीही त्याची इतरही कार्ये आहेत. जवळिकता कशी प्रस्थापित करावी हे शिकवणारा डेटिंग हा प्रभावी मार्ग आहे. डेटिंग मनोरंजन अथवा करमणूक करणारा घटक आहे. स्वतःची ओळख विकसित करण्याकरिता देखील याचा वापर होतो.

वरील कार्ये विशेषतः मानसशास्त्रीय जवळिकतेचा विकास डेटिंगमुळे कसा होतो हा एक प्रश्नच आहे. किशोरांमध्ये याविषयीची कोणती तज्ञता असते अथवा येते याविषयी आश्चर्यच आहे. पूर्व आणि मध्य किशोरावस्थेमधील डेटिंग हे जवळिकता निर्माण करण्यात यशस्वी ठरत नाही. याउलट डेटिंग ही नेहमी वरवर चालणारी कृती असल्याकारणाने यामध्ये व्यस्त असणाऱ्या व्यक्ती एकमेकांसमोर भावनिक दृष्ट्या व्यक्त होत नाहीत. यांनात्यांमध्ये जरी लैंगिक आंतरक्रिया घडल्या तरी देखील मानसशास्त्रीय जवळिकतेचा अभाव असतो.

खरी जवळिकता उत्तर किशोरावस्थेमध्ये प्रामुख्याने पहावयास मिळते. या वेळी डेटिंगला दोघेही अधिक गांभीर्याने घेतात. यामुळे आपला जोडीदार निवडण्याच्या मार्गाच्या रूपात पाहिले जाते व विवाहबंधनात अडकणे या दृष्टीने पाहिले जाते.

समलिंगी किशोरांकरिता डेटिंग वेगळ्या पद्धतीचे आव्हाने निर्माण करतात. समवयस्क अथवा शाळ महाविद्यालयातील सवंगड्यांकडून व्यक्त केल्या गेलेल्या पूर्वग्रहाच्या परिणाम स्वरूपी त्यांच्या चौकटीत बसण्याकरिता भिन्न लिंगी व्यक्तींसोबत डेटिंगचा प्रयत्न केला जातो. समलिंगी किशोरांना जोडीदार शोधण्यामध्ये अडचणी येतात कारण बऱ्याचदा आपली लैंगिक अभिमुखता उघडपणे व्यक्त केली जात नाही. जो व्यक्ती मुक्तपणे अथवा उघडपणे डेट करतात त्यांना छळास सामोरे जावे लागते.

(I) Dating, Race and Ethnicity : डेटिंग, जात आणि वंश : विविध जाती आणि वांशिक समूहाच्या किशोरांच्या डेटिंग आकृतिबंधामध्ये संस्कृतीचा प्रभाव पडताना दिसतो. अमेरिकेमध्ये इतर देशांमधून स्थलांतरित झालेल्या पालकांच्या किशोरांमध्ये विशेष करून याचा प्रभाव जाणवतो. मुलांच्या डेटिंग वर्तनावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न पालक करताना दिसतात. यापाठीमागे आपल्या सांस्कृतिक मूल्यांची जपणूक करणे व आपल्याच जातीच्या, वंशाच्या समूहामध्ये डेट केले जाईल याची खात्री करणे याचा समावेश असतो.

विशेषतः एशियन संस्कृतीच्या पालकांना डेटिंगचा अनुभव नसल्याकारणाने त्यांची अभिवृत्ती आणि मूल्ये याबाबतीत ते अधिक पुराणमतवादी असतात. यामध्ये अनेक पालकांची लग्ने ही इतरांनी जमवलेली (घडवून आणलेली) असल्याकारणाने डेटिंगच्या संपूर्ण प्रक्रियेबाबत ते अनभिज्ञ असतात. यामुळे डेटिंग हे अधिक संरक्षित वातावरणात केले जावे अथवा केलेच जाऊ नये याकरिता ते आग्रही असतात. परिणामी त्यांचे त्यांच्या मुलांशी अधिक वादविवाद होतात.

(II) Sexual behavior लैंगिक वर्तन : परिपक्वतेमधील संप्रेरकांमधील बदल हा फक्त लैंगिक अवयवांनाच उद्दिपित करतो असे नाही तर यामुळे लैंगिकतेच्या स्वरूपात भावनांची नवीन श्रेणी निर्माण केली जाते. लैंगिक वर्तन आणि विचार हे किशोरांच्या केंद्रस्थानी असतात. जवळपास सर्वच किशोर लैंगिकतेविषयी विचार करताना आढळतात.

पहिली लैंगिक क्रिया ज्यामध्ये किशोर हे व्यस्त असतात ती म्हणजे हस्तमैथुन. स्वतःहून लैंगिक उद्दिपन करणे यास हस्तमैथुन असे म्हटले जाते. 15 वर्षांची 80% किशोरवयीन मुले आणि 20% मुली यांनी हस्तमैथुन केल्याचे नमूद करतात. मुलांमध्ये (पुरुषांमध्ये) पूर्व किशोरावस्थेत अधिक प्रमाणात हस्तमैथुन केले जाते ज्यामध्ये नंतर घट होते तर मुलींमध्ये सुरुवातीला याचे प्रमाण कमी असते जे नंतर वाढत जाते. हस्तमैथुनाच्या वारंवारिता आणि आकृतिबंधामध्ये जाती, वंशपरत्वे भेद आढळून येतो.

हस्तमैथुन जरी व्यापक प्रमाणात होताना दिसत असले तरी देखील यामुळे लज्जा आणि अपराधीभावाची निर्मिती होते. यापाठी अनेक कारणे आहेत. यामध्ये पहिले कारण म्हणजे आपण लैंगिक जोडीदार शोधण्यास अक्षम आहोत. जवळपास 54 विवाहित पुरुष आणि 43 विवाहित स्त्रिया वर्षभरात 10 ते 25 वेळा हस्तमैथुन करतात.

हस्तमैथुनाविषयीच्या चुकीच्या समजुतींमुळे देखील अपराधीभाव निर्माण होतो. बालपणात व किशोरांचे वर्तन हे भिन्न आहे. सध्या याकडे सामान्यकृतीच्या दृष्टीने पाहिले जाते. ही कृती आरोग्यदायी तसेच इजा न करणारी या स्वरूपात पाहिली जाते.

Scanned with CamScanner

(iv) Sexual Intercourse लैंगिक आंतरक्रिया : लैंगिक आंतरक्रियेची सुरुवात प्रदीर्घ चुंबन, मालिश अथवा चोळणे, पर्श होणे आणि मौखिक लैंगिक क्रिया यासारख्या लैंगिक जवळिकतेच्या रूपाने होतात. अधिकतर किशोरांच्या दृष्टीने लैंगिक आंतरक्रिया हा महत्त्वाचा किंवा प्रमुख मैलाचा दगड ठरतो. लैंगिक वर्तनाविषयी संशोधन करणाऱ्या संशोधकांचे प्रमुख लक्ष हे भिन्नलिंगी लैंगिक आंतरक्रियांवर आहे.

गेल्या ५० वर्षांपासून पहिल्यांदा लैंगिक आंतरक्रिया करण्याचे सरासरी वयामध्ये लक्षणीय घट होताना दिसते. जवळपास 13% किशोरांनी वयाच्या 15 वर्षापूर्वी लैंगिक क्रिया केल्याचे दिसून आले आहे. सर्वसाधारणपणे पहिल्यांदा लैंगिक आंतरक्रिया करण्याचे सरासरी वय हे 17 आहे. जवळपास 80% किशोर २० व्या वर्षाच्या पहिला लैंगिक आंतरक्रिया करतात. 1991 ते २००७ या दरम्यान लैंगिक आंतरक्रिया पुढे ढकलणाऱ्या अथवा अद्यापही लैंगिक क्रिया केलीच नाही अशा किशोरांची टक्केवारी वाढून 13% झाली आहे.

प्राथमिक किंवा पहिल्या लैंगिक क्रियेबाबत जाणीव आणि शारीरिक भेद पहावयास मिळतात. हे भेद सामाजिक आर्थिक दर्जा, सांस्कृतिक मूल्ये, कुटुंब रचना इत्यादींद्वारे प्रतिबिंबित होतो.

लैंगिक वर्तन / आचरण नियंत्रित करणारे सामाजिक मानदंडांचा विचार न करता आपण लैंगिक कृती निर्धारित करू शकत नाही. कित्येक वर्षांपूर्वी याविषयीचे नियम हे दुटप्पी होते जसे विवाहपूर्व लैंगिक कृती या पुरुषांना अनुज्ञेय होत्या परंतु स्त्रियांकरिता वर्ज्य होत्या. स्त्रियांना सांगितले जायचे की चांगल्या मुली हे करीत नाहीत तर पुरुषांना मात्र हे करण्यास परवानगी आहे असे सांगितले जायचे. असे असले तरीही त्यांना कुमारिकेशीच लग्नाची ओढ असायची.

सध्या या दुटप्पी नियमांची जागा नवीन नियमाने घेतली त्याला Permissiveness with affection स्नेहभाव (प्रेमाने) परवानगी असे म्हटले गेले. त्यानुसार विवाहपूर्व आंतरक्रियांकडे स्त्रीपुरुष संबंध हे दीर्घकालाकरिता, करारबद्ध आणि प्रेमयुक्त असल्यास दोघांनाही म्हणजेच स्त्रिस तसेच पुरुषास याविषयीची परवानगी असेल.

या दुटप्पी धोरणांचा अंत जरी दूर असला तरीही लैंगिक वर्तनाप्रती अभिवृत्ती ही पुरुषांकरिता स्त्रियांच्या तुलनेत सौम्य आहे. हा भेद सामाजिक दृष्ट्या उदारमतवादी असणाऱ्या देशांमध्ये देखील आढळतो. काही संस्कृतींमध्ये तर पुरुष आणि स्त्रियांकरिता लैंगिक वर्तन किंवा धोरणे ही भिन्न भिन्न असल्याचे दिसते. उदा. उत्तर अमेरिका, मध्य पूर्व देश, आणि अधिकतर आशियाई देशांमध्ये स्त्रियांनी विवाहपूर्व लैंगिक क्रियांपासून दूर रहावे असे मानदंड आहेत. मेक्सिको विवाहपूर्व लैंगिक संबंधाकरिता कठोर धोरणे असताना देखील पुरुषांबाबत याविषयी सूट माफ दिल्याचे जाणवते. याउलट उप-सहारन आफ्रिका मध्ये किशोरवयीन मुलींमध्ये लैंगिक आंतरक्रिया मुक्तपणे आढळतात. शिवाय स्त्रियांना विवाहपूर्व लैंगिक आंतरक्रिया करण्यास परवानगी असल्याचे पहावयास मिळते.

Ⓑ Sexual Orientation लैंगिक अभिमुखता :

जेव्हा आपण किशोरांमधील लैंगिक विकास गृहित धरतो तेव्हा डोळ्यासमोर येणारा अधिकतर आकृतिबंध म्हणजे विषमलैंगिकता Heterosexuality इतर अथवा विरुद्ध लिंगाप्रतीचे लैंगिक आकर्षण व निर्देशित वर्तन यास विषमलैंगिकता असे म्हणतात तरीही काही किशोर हे समलिंगी असतात. समलैंगिकतेमध्ये लैंगिक आकर्षण आणि वर्तन हे

आपल्या सारख्या लिंगाच्या व्यक्तीकडे निर्देशित असते. पुरुष समलैंगिक व्यक्तींना Gay तर स्त्री समलैंगिक व्यक्तींना lesbian असे म्हणतात. तर इतर काही व्यक्ती ज्या दोन्ही लिंगांच्या व्यक्तींकडे आकर्षित होतात त्यांना द्विलैंगिक Bisexual असे म्हणतात.

अनेक किशोर समलैंगिकता बाबत प्रयोगशील असतात. जवळपास २० ते २५ % किशोरवयीन मुले आणि १० % मुली कधी ना कधी किमान एकदा तरी होईना आपल्याच लिंगाच्या व्यक्तीची गाठ पडते अथवा सामना होतो. खरेतर सम आणि विषम लैंगिकता या पूर्णतः भिन्न अभिमुखता नाही आहेत. आलफ्रेड किन्से (Alfred Kinsey) यांना आद्य लैंगिक संशोधक म्हणून ओळखले जाते त्यांच्या मते लैंगिक अभिमुखतेला सलग रूपात संवेदित करावयास हवे. समलैंगिकता हे एक टोक आहे तर विषमलैंगिकता हे दुसरे टोक. या दोन्ही टोकांदरम्यान व्यक्ती सम अथवा विषमलैंगिक वर्तन प्रदर्शित करीत असते. याविषयीची निश्चित आकडेवारी स्पष्ट करणे अवघड आहे तथापि अधिकतर तज्ञ व्यक्तींच्या मते ५ ते १० टक्के स्त्रीपुरुष हे समलिंगी असतात.

लैंगिक अभिमुखतेचे निर्धारण हे लैंगिक अभिमुखता आणि लिंग ओळख यादोहोंमधील भेदामुळे गोंधळाचे गुंतागुंतीचे बनते. लैंगिक अभिमुखता ही एखाद्याच्या लैंगिक आवडीशी निगडीत आहे तर लिंग ओळख आपण मानसशास्त्रीय दृष्ट्या कोणत्या लिंगाचे आहोत या विषयीचा विश्वास म्हणजे लिंग ओळख होय. लैंगिक अभिमुखता आणि लिंग ओळख या दोन गोष्टी एकमेकांशी निगडीत असाव्यात असे काही नाही. तीव्र लोभवी अथवा पौरुषीय लिंग ओळख असणारा पुरुष हा इतर पुरुषाकडे आकर्षित होऊ शकतो.

काही व्यक्ती या transsexual परा लैंगिकतेच्या रूपात स्वतःला पाहतात - अशा व्यक्तींना आपण विरुद्ध लिंगी व्यक्तीच्या शरीरामध्ये अडकून पडल्याचे वाटते. यामध्ये लैंगिक ओळखीविषयीचा अंतर्भाव असणाऱ्या लिंग विषयक सकारात्मक समावेश होतो. परालैंगिकतेच्या व्यक्ती लिंग बदलाची शस्त्रक्रिया करून घेतात ज्यामध्ये त्यांना नको असणारे लिंग काढून टाकले जाते व हवे असणा-या लिंगाची निर्मिती केली जाते. ही अवघड प्रक्रिया असल्या कारणाने शस्त्रक्रियेपूर्वी समुपदेशन करावे लागते, संप्रेरकांचे इंजेक्शन द्यावे लागते शिवाय इच्छित लिंगाच्या व्यक्तीसारखे शस्त्रक्रियेपूर्वी अनेक दिवस रहावे लागते. यानंतरच याची फलश्रुती ही धनात्मक होते.

परलैंगिक व्यक्ती या द्विलिंगी व्यक्तीपेक्षा भिन्न असतात. द्विलिंगी (Intersex or hermaphrodite) व्यक्ती मध्ये दोन्ही लिंगाचे किंवा रंगसूत्र किंवा जनुकीय आकृतिबंधाचे एकत्रीकरण पहावयास मिळते. तथापि याचे प्रमाण कमी आहे ४५०० जन्मांमध्ये केवळ एक नवजात या प्रकारचे जन्मास येते.

(I) What determines Sexual Orientation लैंगिक अभिमुखतेचे निर्धारण

कसे होते? व्यक्तीमध्ये विषमलैंगिकता, समलैंगिकता अथवा द्विलैंगिकता उत्पन्न करणारे कोणते घटक आहेत याविषयी पुरेसे आकलन होताना दिसत नाही. पुराव्यांचा विचार करता यापाठी अनुवांशिक आणि जैविक घटकांची महत्वपूर्ण भूमिका असल्याचे दिसून येते. सयामी जुळ्यांमध्ये ही समलिंगी असण्याची शक्यता असते असे जुळ्यावरील अध्ययनातून स्पष्ट होते. समलिंगी व विषमलिंगी व्यक्तींच्या मेंदूची संरचना ही भिन्न भिन्न असल्याचे संशोधनाद्वारे स्पष्ट झाले आहे. लैंगिक अभिमुखतेशी संप्रेरकांच्या निर्मितीचाही संबंध असल्याचे दिसून येते.

कुटुंब आणि समवयस्क नातेसंबंध, परिवेश हे घटक देखील महत्त्वाची भूमिका बजावतात असे काही अभ्यासातून स्पष्ट झाले आहे. उदा.: भिन्न लिंगी पालकांशी योग्य पद्धतीने तादात्मीकरण झाले नसल्याचा परिणाम स्वरूपी समलैंगिकतेची निर्मिती होते असे फ्रॉईड सुचवतो. फ्रॉईड आणि इतर सिद्धांताविषयीची सर्वात मोठी अडचण म्हणजे लैंगिक अभिमुखतेशी कोणताही कौटुंबिक घटक अथवा बालसंगोपनाच्या पद्धती निगडीत आहे याविषयीचा पुरावा हे सिद्धांत देऊ शकत नाहीत. समलैंगिकता ही सुखद समलिंगी अनुभव, प्रचलित कठोर अथवा वर्चस्व देणारा सुखद अनुभव, तर अलभ्याघातकारक भिन्नलिंगी अनुभवातून निर्माण होते असा अध्ययनवादी दृष्टिकोण सुचवतो.

थोडक्यात काय तर काही किशोरांमध्ये विषमलिंगी अभिमुखता व इतरांमध्ये समलिंगी अभिमुखता विकसित होते याचे कोणतेही स्विकारार्ह स्पष्टीकरण मिळताना दिसत नाही. अधिक-तर तज्ञांच्या मते संकीर्ण जनुकीय, शरीरशास्त्रीय आणि परिवेशीय घटकांच्या आंतरक्रियेतून लैंगिक अभिमुखता विकसित होते.

एक मात्र स्पष्ट आहे स्वतःच्याच लिंगाच्या व्यक्तींकडे आकर्षित होणाऱ्या किशोरांना इतर किशोरांच्या तुलनेत अधिक अडचणींना सामोरे जावे लागते. अमेरिकन समुदायामध्ये समलैंगिकते विषयी अधिक दुर्लक्ष आणि पूर्वग्रह असल्याचे पहावयास मिळते. याविषयीच्या निवडी करण्याचा व्यक्तीला हक्क आहे हा विश्वास कायम आहे तथापि त्यांना तो हक्क मिळत नाही. समलिंगी किशोरांना कुटुंब, समवयस्कांकडून नाकारले जाते. जर त्यांनी त्यांची अभिमुखता जाहीर केली तर त्यांना अपमानित केले जाते, छळ केला जातो. परिणाम स्वरूपी समलैंगिक तरुणांमध्ये अवसाद निर्माण होण्याचा धोका अधिक असतो. विषमलिंगी किशोरांच्या तुलनेत समलिंगी किशोरांमध्ये आत्महत्येचे प्रमाण लक्षणीय इतक्या अधिक आहे. जे समलिंगी किशोर लिंगविषयक सातत्यतेमध्ये वसत नाहीत ते बळी पडण्याची शक्यता अधिक असते. सध्या किशोरांमध्ये समायोजनाचे प्रमाण अत्यल्प असते.

उलटपक्षी अधिकतर व्यक्ती त्यांच्या लैंगिक अभिमुखतेवर आपली पकड मजबूत बनवतात आणि त्याप्रती समाधानी असतात. समलिंगी, द्विलैंगिक अभिमुखता असणाऱ्या किशोरांना तणाव, पूर्वग्रह, भेदभाव यामुळे मानसिक आरोग्यविषयक अडचणी अनुभवत असले तरी देखील समलैंगिकता ही काही मानसिक आजार समजला जात नाही. अधिकतर मानसशास्त्रीय आणि वैद्यकीय संघटना समलिंगीप्रती भेदभाव कमी करण्याकरिता धडपडत आहेत. समाजाचा समलैंगिकतेविषयीची अभिवृत्ती बदलत आहे विशेषतः तरुणवयीन व्यक्तींमध्ये. उदा. अधिकतर अमेरिकन नागरिकांनी समलैंगिक विवाहास कायदेशीर मान्यता मिळावी याचे समर्थन केले होते. त्यामुळे त्यास 2015 मध्ये कायदेशीर मान्यता प्राप्त झाली.